14-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/13/2025 11:27 PM Page 1



## निवडक

### वळवईत १६ रोजी शिवजयंती उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १३ :** वळवई येथील श्री शिव छत्रपती प्रतिष्ठानतर्फे तिथीनुसार शिवजयंती उत्सव येत्या रविवार, दि. १६ मार्च रोजी विविध कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे. यानिमित्त रंगखांब ग्रुप कणकवली प्रस्तुत 'जय जय कार छत्रपतींचा' हा खास कार्यक्रम होणार आहे. याशिवाय अखिल गोवा पातळीवर ऐतिहासिक विषयावर वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जय जयकार छत्रपतींचा विशेष कार्यक्रमात १६ रोजी संध्याकाळी ५ वा. महाराजांची गाणी, तलवारबाजी, लाठी काठी, पोवाडा, पारंपरिक वाद्य या कार्यक्रमाबरोबरच करपल्लवी या गुप्त भाषा कलेचे तसेच स्वतः छत्रपती व बहिर्जी ज्या भाषेमध्ये बोलत होते, अशा दुर्मिळ कलेचे सादरीकरण होईल. त्यानंतर अखिल गोवा पातळीवर वेशभूषा स्पर्धा होणार असून ही स्पर्धा १५ वर्षांखालील व १५ वर्षांवरील अशा दोन गटात घेण्यात येईल. १५ वर्षांखालील गटासाठी ३०००, २०००,१०००, ७५०, ७५० अशी बक्षिसे तर १५ वर्षांवरील गटासाठी ५०००, ३०००, २०००, १०००, १००० अशी बक्षिसे आहेत. दि.१७ रोजी संध्याकाळी ५ वा. छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे, असे आयोजन समितीच्या अध्यक्ष निता तारी यांनी कळविले आहे.

---

### सावईवेरेतील सातेरी देवस्थानचा उद्या होलिकोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १३ :** सावईवेरे येथील श्री सातेरी देवस्थानचा होलिकोत्सव व गडोत्सव येत्या शनिवार दि. १५ मार्च रोजी होणार आहे. यानिमित्त धुलीवंदनाचा कार्यक्रमही होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### चोपडेत आज 'महिमा शिवचक्र तीर्थाचा'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३ :** चोपडे येथील श्री भूमिका देवस्थानात शिमगोत्सवानिमित्त दर्या सम्राट वेताळ देवस्थानच्या प्रांगणात शुक्रवार, दि. १४ मार्च रोजी रात्री १० वाजता चेंदवणकर दशावतारी नाट्य मंडळातर्फे पातिव्रत्य तेज अर्थात महिमा शिवचक्र तीर्थाचा हा ट्रिकसिन युक्त नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. या नाटकात त्रिसुराची तपश्चर्या ,महाकाय नदीवरून शंकर दर्शन,मंदिरातून शेष दर्शन,महाकाय राक्षसातून कालकाशाची निर्मिती , प्रत्यक्ष महाकाय किड्यांची निर्मिती,महाकाय किड्यांतून सुंदरीची निर्मिती,कैलास पर्वतावर शंकराचे दर्शन,महाकाय किड्याचे राक्षसाला गिळणे,शिवपिंडीतून शंकर दर्शन, किड्याकडून सुंदरीला गिळणे,कैलास पर्वतावरून वीरभद्राची निर्मिती,वीरभद्राच्या त्रिशुळातून राक्षसाचा वध अशा अनेक ट्रिक सीन्स चा समावेश आहे.

---

### कार्निवल महोत्सवात अनिषकुमार पोके यांचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३ :** अखिल गोवा कार्निव्हल महोत्सवातील वेशभूषा स्पर्धेत मोरजी पेडणे येथील अनिशकुमार पोके यांनी म्हापसा कार्निव्हल महोत्सवात मच्छीमारच्या वेशभूषेसाठी अखिल गोवा वेशभूषा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच मांद्रे कार्निव्हल प्रथम क्रमांक, पणजी कार्निव्हल द्वितीय क्रमांक आणि वास्को कार्निव्हल द्वितीय क्रमांक पटकावला. यापूर्वी त्यांनी पोदेर, रेंदेर , शेतकरी, महात्मा ज्योतिबा फुले, प्रभू श्रीराम, वासुदेव, शंकर, राखणदार, श्री देव रवळनाथ यात अखिल गोवा वेशभूषा स्पर्धेत त्यांनी अनेक पारितोषिके पटकावलेली आहेत. त्याचबरोबर गणेशोत्सवाच्या निमित्ताने अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे त्यांनी पर्यावरणपूरक देखावे साकारून राज्यपातळीवरती अनेक पारितोषिके मिळवलेली आहेत.

---

### साळगाव ब्लॉक महिला काँग्रेसची बैठक उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १३ :** साळगाव ब्लॉक महिला काँग्रेसने १ गोवा प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तुलियो डिसोझा, जीपीसीसी उत्तर जिल्हा अध्यक्ष वीरेंद्र शिरोडकर, साळगाव पीसीसी ब्लॉक अध्यक्ष अतुल नाईक, गोवा प्रदेश महिला काँग्रेसअध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप, माजी जीपीसीसी अध्यक्षा बीना नाईक, जीपीसीसी राज्य सरचिटणीस लिबेरता मदेरा आणि जीपीसीसी साळगाव ब्लॉक अध्यक्षा इशिका वाळके यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. साळगाव ब्लॉकने नवनियुक्त महिला काँग्रेस अध्यक्ष डॉ. प्रतीक्षा खलप यांचे हार्दिक स्वागत केले. बैठकीदरम्यान, नेत्यांनी महिलांना प्रभावित करणाऱ्या विविध समस्या आणि चिंतांवर चर्चा केली, तसेच संभाव्य उपायांवर चर्चा केली. सर्व सहभागींमध्ये सक्रिय संवाद साधून हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला. डॉ. प्रतीक्षा खलप यांनी महिला काँग्रेसच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि चालू सदस्यता मोहिमेतील कामगिरीवर आधारित प्रमाणपत्रे देऊन सदस्यांच्या योगदानाची दखल घेतली. महिला काँग्रेसने सप्टेंबर २०२४ मध्ये सदस्यता मोहीम सुरू केली आणि संघटना अधिक मजबूत करण्यासाठी ती २०२५ पर्यंत सुरू राहील.

# रोहित-हार्दिकमधील वाद मिटणार

## मुंबई इंडियन्सला मिळाले नवे प्रशिक्षक | पांड्या असणार कर्णधार



**मुंबई, दि. १३:** मुंबई इंडियन्सच्या संघाचा कर्णधार गेल्यावर्षी बदलण्यात आला होता. रोहित शर्माला कर्णधारपदावरुन कोणतेही कारण नसताना काढण्यात आले होते. रोहितच्या जागी हार्दिकला कर्णधारपद देण्यात आले. त्यानंतर मुंबई इंडियन्सच्या संघावर चाहत्यांनी जोरदार टीका केली होती आणि हार्दिक पांड्याला संपूर्ण मोसमात ट्रोल करण्यात आले होते. हार्दिक आणि रोहित यांच्यात विस्तवही जात नसल्याचे पाहायला मिळाले होते. पण आता मुंबई इंडियन्सच्या संघात नवीन प्रशिक्षक दाखल झाल्यामुळे हा वाद आता मिटणार असल्याचे संकेत आता मिळत आहेत.

मुंबई इंडियन्सने एक व्हिडिओ शेअर करत आता ही नवीन माहिती दिली आहे. या नवीन व्हिडिओची सुरुवात हार्दिक पांड्यापासून होते. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा पाहायला मिळत आहेत. त्यानंतर रोहित शर्मा म्हणतो की, आम्ही एवढ्या वेळापासून वाट पाहतोय, कुठे आहे, कोण येणार आहे... त्यानंतर या व्हिडिओमध्ये नवीन प्रशिक्षकांची एंट्री होत असल्याचे आता समोर आले आहे. मुंबई इंडियन्सचा एक व्हिडिओ आता जोरदार व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये मुंबई इंडियन्सने आपल्या नवीन प्रशिक्षकांना दाखवले आहे.

मुंबई इंडियन्सने स्पिरीट कोच म्हणून यावेळी बॉलीवूडचे अभिनेते जॅकी श्रॉफ यांची निवड केल्याचे आता समोर आले आहे. जॅकी श्रॉफ हे मुंबई इंडियन्सचे स्पिरीट कोच असतील, असे आता म्हटले जात आहे. त्यामुळे या हंगामात ते संघातील स्पिरीटी वाढवण्याचे काम करणार असल्याचे आता समोर येत आहे. जॅकी श्रॉफ यांचे मुंबई इंडियन्सच्या संघात आगमन झाले आहे. सोशल मीडियावर हा मुंबई इंडियन्सचा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.





# जसप्रीत बुमराहची कारकिर्द संपुष्टात ?

**नवी दिल्ली, दि. १३ :** ऑस्ट्रेलियामध्ये बॉर्डर-गावस्कर कसोटी चषकाच्या पाचव्या कसोटीदरम्यान भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतग्रस्त झाला होता. पाचव्या कसोटीच्या पहिल्या इनिंगमध्ये काही काळ त्याला मैदानाबाहेर जावे लागले होते. दुसऱ्या इनिंगमध्ये दुखापत वाढल्यामुळे जसप्रीत बुमराहला गोलदांजी करता आली नव्हती. पाठीत दुखापत झाल्यानंतर त्याला काही दिवसांपूर्वी झालेल्या चॅम्पियन्स ट्राफीलाही मुकावे लागले.

मागच्या काही वर्षांमध्ये बुमराहच्या क्रिकेट कारकिर्दीला दुखापतीचे ग्रहण लागले आहे. २०२२-२३ मध्येही दुखापतीमुळे त्याला बराच काळ मैदानाबाहेर बसावे लागले होते. २०२३ साली बुमराहने पुनरागमन करत एकदिवसीय विश्वचषकात भाग घेतला होता. जसप्रीत बुमराहने २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. सध्या त्याच्या पुनरागमनाची कोणतीही माहिती समोर आलेली नाही. यंदाचा आयपीएल हंगामातही सुरुवातीचे काही सामने बुमराह खेळू शकणार नसल्याचे सांगितले जाते. जसप्रीत बुमराह मैदानावर पुन्हा कधी दिसणार याची चाहत्यांना उत्सुकता लागलेली असताना त्याच्याबद्दल बऱ्याच उलट सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

न्यूझीलंडचा माजी क्रिकेटपटू, वेगवान गोलंदाज शेन बॉन्डने

**▶ शेन बॉन्डने दिला सावधानतेचा इशारा**

बुमराहच्या दुखापतीबद्दल मोठे भाष्य केले आहे. शेन बॉन्डची कारकिर्दही दुखापतीमुळे संपली होती. त्यामुळे वेगवान गोलंदाजाची दुखापत किती गंभीर ठरू शकते, याबाबत त्याने भाष्य केले आहे. बुमराहच्या पाठीवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे, त्याच जागी पुन्हा दुखापत झाल्यास बुमराहची कारकिर्द संपू शकते, असे शेन बॉन्डने म्हटले आहे. शेन बॉन्डने पुढे म्हटले की, आता वेळ आली आहे. भारताच्या टॉप मॅनेजमेंटने बुमराहवरील ताण कमी केला पाहिजे.

बॉन्डच्या मतानुसार, बुमराह जेव्हा कसोटी क्रिकेट खेळून लगेच टी-२० खेळण्यासाठी उतरतो, तेव्हा खरी अडचण निर्माण होते. याच कारणामुळे त्याला बुमराहच्या भविष्याची चिंता वाटते. आयपीएलचा १८ वा हंगाम २२ मार्च पासून सुरू होत आहे. बुमराह मुंबई इंडियन्स संघातील महत्त्वाचा खेळाडू आहे. शेन बॉन्डने पुढे म्हटले की, बुमराह आता ठिक आहे. पण हे शेवटी त्याच्यावरील कामाच्या ताणावर अवलंबून आहे. मी तर हेच म्हणेन की, क्रिकेट बोर्डाने त्याच्यावरील कामाच्या ताणाचे व्यवस्थापन करायला हवे. वर्षभरात असलेल्या सीरीज पाहून त्याला अधूनमधून विश्रांती द्यायला हवी. त्याला विश्रांती देण्याचा निर्णय बोर्डाने घ्यायला हवा. बुमराहचा विचार करून बोर्डाला योग्य तो निर्णय घ्यावा लागेल.

# केपे महाविद्यालयात उद्योजकीय कौशल्यांवर चर्चा

**▶ कन्व्हर्ज २.० अंतर्गत शैक्षणिक उद्योग शिखर परिषद उत्साहात : मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

■ टीम दैनिक हेराल्ड



केपे, दि. १३ : कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय केपे येथील टीआयपी सेल, उच्च शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण परिषद गोवा तसेच सीएसआरबीओएक्स संस्थेची आयआयसी यांच्या संयुक्त विद्यमाने केपे सरकारी महाविद्यालयाच्या सभागृहात कन्व्हर्ज २.० शिक्षा उद्योग संगम - एक शैक्षणिक उद्योग शिखर परिषद उत्साहात पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एआर माईन्स ग्रुपचे संचालक अरमान बँकले आणि सन्मानीय अतिथी म्हणून डॉ. महेंद्र जे.ए.आल्वारिस, कन्व्हर्ज २.० चे मुख्य समन्वयक डॉ. नियॉन मार्शेन, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. के. संगीता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवातीला बी.ए. भाग दोनच्या विद्यार्थ्यांनी कलात्मकरित्या मानवी सावलीच्या नाट्यसादरीकरणातून कन्व्हर्ज २.० ची सर्जनशीलता अधोरेखित झाली. प्रास्ताविकात प्रो.डॉ. नियॉन मार्शेन यांनी गोव्यात अशा उपक्रमांची प्रमाण वाढविण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर, कार्यक्रम समन्वयक डॉ.के.संगीता यांची मनोगते झाली.

एआर माईन्स ग्रुपचे संचालक अरमान बँकले आणि सन्मानीय अतिथी म्हणून डॉ. महेंद्र जे.ए.आल्वारिस यांनी भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज असलेल्या कार्यशक्तीला आकार देण्यात शैक्षणिक - उद्योग सहकार्याच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला. गोवा विद्यापीठाच्या गोवा बिझनेस स्कूलच्या डीन सी.ए पूर्वा जी हेगडे-देसाई यांनी एनईपी 2020 च्या अनुषंगाने आंतरविद्याशाखीय उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित केले. उद्योजकीय कौशल्ये, संवाद आणि करियर तयारी यावर लक्ष केंद्रित करून वर्गखोल्या ते व्यावसायिक कक्षात संक्रमणाचा विचार करायला लावणारी गटचर्चा रंगली.

# नवीन शैक्षणिक धोरणातून मुलांच्या पंचेंद्रियांचा विकास



■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १३ :** विद्यार्थ्यांच्या कृतीशिलतेला प्राधान्य देणे महत्त्वाचे असून त्यांना स्वतः विविध प्रकारचे अनुभव घेणारे कृतीयुक्त शिक्षण महत्त्वाचे आहे. हे शैक्षणिक धोरण संपूर्ण भारतात लागू करण्यात येणार आहे. वयाच्या तीन ते आठ वर्षांपर्यंत मुलांच्या मेंदूचा ८५ टक्के विकास होत असतो. नवीन शैक्षणिक धोरण मुलांच्या मेंदूवर आधारित असून अभ्यासात त्यांच्यात पंचेंद्रियांचा विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षक आणि पालक यांनी संयुक्तरित्या प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्राचार्य अनिल सामंत यांनी

**▶ प्रा. अनिल सामंत : मदनंत मुक्तांगण शिशुवाटिकेत नव्या शैक्षणिक धोरणावर व्याख्यान**

सांगितले.

धुपे - सावईवेरे येथील मदनंत मुक्तांगण या शिशुवाटिकेत नव्या शैक्षणिक धोरणावर आयोजित केलेल्या व्याख्यानात मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर तृप्ती बाणावलीकर व मोहन वेरेकर उपस्थित होते.

प्रा. सामंत म्हणाले की प्रत्येक मुलाच्या अंगात एकतरी चांगला गुण असतो. माझा मुलगा कोणत्या क्षेत्रात पुढे येईल हे पालकाने शोधणे महत्त्वाचे असून त्यांच्या अंतरंगातील गुण तपासावे लागतील. मुलांच्या इंद्रियांचा विकास होणे आवश्यक असून त्यात दिव्यत्व जाणवते, असे शिक्षण नेहमी आवश्यक आहे.

शिक्षक व पालक यांचा केवळ उपदेश महत्त्वाचा नसून मुलांनी प्रत्यक्ष प्रयोग करून अनुभव घेण्यासाठी त्यांना कृतीयुक्त शिक्षण दिले जाणे, हाच नव्या शिक्षणाचा उद्देश आहे. लहान वयातच मुलांचे स्नायू सक्षम होत असतात. म्हणून मेंदूवर आधारित व भारत केंद्रित शिक्षण पद्धती महत्त्वाची असून मुलांना आपली माती, आपली माणसे, झाडे, वेली, निसर्ग इत्यादी पंचकोषात्मक विकास होणे आवश्यक आहे. देशातील सुमारे १ लाख शिक्षक , विद्वान व्यक्ती, वैज्ञानिक अशा व्यक्तींच्या सहभागातून ही नवीन शिक्षण पद्धती केली आहे.

प्रथम तृप्ती बाणावलीकर यांनी काही कृतीयुक्त पद्धती सादर केल्या. प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख राजदीप नायक यांनी केली. त्यानंतर प्रा. अनिल सामंत, तृप्ती बाणावलीकर, दीपक मणेरीकर, मोहन वेरेकर, सुषमा अभिषेकी, मकरंद अभिषेकी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. शेवटी सुषमा अभिषेकी यांनी आभार मानले. यावेळी बरेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# स्त्रियांना सर्व हक्क दिल्यास समाजात येईल समृद्धी

## डॉ.वृंदा बोरकर | गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठानतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड



पणजी : महिला दिन सोहळ्यांत संचालक भूषण सावईकर, मुख्य मार्गदर्शक डॉ. वृंदा बोरकर, अध्यक्ष एम.के.जनार्थनम्, व्यवस्थापकीय संचालक प्रो.सावियो फालेरो, संयुक्त संचालक लिझा परेरा फर्नांडिस, कला चिकित्सक ॲड. इमिडिवो डिसोझा पिन्हो.

**पणजी, दि. १३ :** स्त्रियांना त्यांच्या हक्काचे जे काही आहे, ते सर्व मिळायला हवे. ते मिळाल्यास घरात शांती आणि सौहार्द राहील आणि समाजात समृद्धी येईल,

असे प्रतिपादन धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय मिरामारच्या माजी प्राचार्या आणि गोवा महिला आयोगाच्या सदस्य डॉ. वृंदा बोरकर यांनी केले.

गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठान आयोजित केलेल्या जागतिक महिला दिन सोहळ्यात लिंग समानता या विषयावर त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून आज पर्वरी येथे गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठानच्या सभागृहात बोलत होत्या. यावेळी मंचावर उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष एम.के.जनार्थनम्, लेखापाल विभागाच्या संयुक्त संचालक लिझा परेरा फर्नांडिस, कला चिकित्सक ॲड. इमिडिवो डिसोझा पिन्हो आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष एम.के.जनार्थनम् यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. मनोज इब्रामपूरकर यांनी मुख्य मार्गदर्शक डॉ. वृंदा बोरकर यांचा परिचय करून दिला.व्यवस्थापकीय संचालक प्रो.सावियो फालेरो यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ वृंदा बोरकर यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन जयदा परब यांनी केले. तर आभार लेखापाल विभागाच्या संयुक्त संचालक लिझा परेरा फर्नांडिस यांनी मानले.

आधुनिक समाजव्यवस्थेत कामाबद्दल स्त्री-पुरुष अशी सरळ सरळ विभागणी झालेली दिसते. या विभागणीला रोखून मुलींची कामे आणि मुलांची कामे असे न म्हणता कामाविषयीचा सकारात्मक आणि समान दृष्टिकोन मुलांमध्ये रुजविणे गरजेचे आहे, असे डॉ. वृंदा बोरकर म्हणाल्या.

### आधुनिक भारतीय शिक्षणव्यवस्थेत स्त्रीचे स्थान

**भारतीय शैक्षणिक सेक्टरमध्ये स्त्रीची टक्केवारी ३० असून तिच्या साक्षरतेचा दर ७७ टक्के इतका आहे. शिक्षणामध्ये महिलांचे प्रमाण ४८ टक्के असून शाळांमध्ये शिक्षिका असण्याचे प्रमाण ५३.३ टक्के आहे, तर उच्च शिक्षणामध्ये हे प्रमाण ४२.९ असल्याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण डॉ. वृंदा बोरकर यांनी केले.**

### तृतीयपंथीयांना माणूसपणाची वागणूक मिळणे गरजेचे

**तृतीयपंथी हा भारतीय समाजाचा घटक असून त्यांना माणूसपणाची वागणूक मिळाली पाहिजे, असे उद्गार यावेळी डॉ. वृंदा बोरकर यांनी काढले. कोणत्याही अर्जात स्त्री, पुरुष आणि इतर असे कॉलम तयार झाले असून २०१९ नंतर तृतीयपंथीयांनी कायदेशीर प्रक्रियेतून हक्क मिळविल्याचा संदर्भही डॉ. वृंदा बोरकर यांनी दिला.**



साखळी : प्रमुख पाहुण्या डॉ. शांभवी गाडगीळ, सन्मानीय अतिथी पूजा राणे, संशोधन आणि विकास विभागाच्या समन्वयक डॉ. सुफला पुजारी व इतर मान्यवर.

# साखळी महाविद्यालयात जागतिक महिला दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १३ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय साखळी येथील समुपदेशन आणि मूल्यशिक्षण कक्षाच्या सहकार्याने संशोधन आणि विकास कक्षाच्या वतीने शिक्षकेत्तर कर्मचारी महिलांसाठी महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. शांभवी गाडगीळ होत्या. तर सन्माननीय अतिथी म्हणून माजी विद्यार्थिनी श्रीमती पूजा राणे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन संशोधन आणि विकास विभागाच्या समन्वयक डॉ. सुफला पुजारी आणि रोसालिना डिसिल्वा

**▶ विविध स्पर्धांचे आयोजन; महिला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

यांनी केले. उपप्राचार्य प्रीती पेडणेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कोमल चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. तर उपप्राचार्य (प्रशासन) रोसालिना डिसिल्वा यांनी आभार मानले. डॉ. निशा केवट यांनी या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.

**मनाच्या योग्य वापरातून सामाजिक प्रगती : डॉ. गाडगीळ**

डॉ.शांभवी गाडगीळ यांनी मन या विषयावरती बोलताना मन ही संकल्पना सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरांमध्ये खोलवर रुजलेली असून ती शक्तिशाली उर्जेचा संदर्भ देते असे सांगितले. मनाचा प्रभावी आणि योग्य वापर महिलांनी करायला हवा, असे त्या म्हणाल्या. या वापरातून सामाजिक प्रगती महिला अधिकपणे करू शकतात, असे डॉ. गाडगीळ यांनी सांगितले.

**महिलांच्या कलागुणांना संधी**

महिला दिनानिमित्त गजरा बनविणे, सर्वोत्तम पोशाख, सर्वोत्तम केशरचना अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. पूजा राणे, प्रीती पेडणेकर, मंदा परब, डॉ. ज्योस्ना गावस, प्रीतम नाईक, अंकिता, अनुष्का पणजीकर, सुषा आणि वैशाली यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 191 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .